# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४१२/२०२३ दिनांक – ०२/१२/२०२३

## मित्राचा खुन करुन फरार झालेला विधीसंघर्ष बालक यास मुंबई येथुन ताब्यात घेण्यास नायगाव पोलीस ठाणे गुन्हा प्रकटीकरण शाखेस यश.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २२/११/२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० चे पुर्वी नक्की तारीख व वेळ माहिती नाही नायगाव पुर्व, बाफाणे ब्रिज, अहमदाबाद दिशेला ज्या ठिकाणी संपतो त्या लगत असलेल्या नरेश मोटार गॅरेज च्या मागे असलेल्या मोकळया शेतातील बांधावर असलेल्या नाल्यामध्ये, नायगाव पुर्व ता. वसई, जि-पालघर फिर्यादी नायगाव पोलीस ठाणे अपमृत्यु ७२/२३ मधील खबर देणार श्री पंकज आत्माराम मोरे हे त्यांचे मित्र विक्रम भंडारी याचे सोबत कामाचे निमित्ताने दिनांक २२.११.२०२३ रोजी बापाने ब्रिज जवळ येवुन बापाने ब्रिज गुजरात वाहिनीवर जेथे संपतो,तेथुन नरेश मोटार गॅरेजचे पाठीमागे असलेल्या मोकळया जागेतील शेतात लघुशंकेला गेले असता शेताच्या बांधावर झुडुपात उताणे स्थितीतील एक संपुर्ण कुजलेले व शरिरावरिल त्वचा गळुन निघुन जावुन आतील हाडे दिसत असलेले पुरुष जातीचे अंदाजे २५ ते ३० वर्षे वय असलेले प्रेत दिसुन आले नंतर त्यांनी बापाने पोलीस चौकी येथे जावुन पोलीसांना कळविले असुन सदर बाबत पोलीस ठाणेत दिलेल्या खबरीवरुन सदर अकस्मात मृत्यु दाखल आहे

सदर अकस्मात मृत्युचे झाले तपासामध्ये तसेच मा. वैदयकीय अधिकारी यांनी प्रेतावर शवविच्छेदन झाले नंतर दिलेले कॉझ ऑफ डेथ वरुन अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन दिनांक २२.११.२०२३ रोजीचे पूर्वी नक्की तारीख वेळ माहित नाही नायगाव पुर्व, मुंबई अहमदाबाद हायवेवर,बापाने ओव्हर ब्रिज अहमदाबाद दिशेला ज्या ठिकाणी संपतो त्या लगत असलेले नरेश मोटार गॅरेज च्या पाठीमागील बाजुस मोकळया शेतात मयताचे डोकयात दगड तसेच इतर कोणत्यातरी हत्याराने गंभीर दुखापत करुन त्याचा खुन करुन पुरावा नष्ट करण्याचे उददेश्याने मयत याचे प्रेत शेतालगत असलेल्या नाल्यामध्ये दाट झुडपात टाकुन देवुन पुरावा नष्ट केला म्हणुन नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं । ४१०/२०२३ भा.द.वि.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

नमुद गुन्हयातील अनोळखी मयताचे शोधाकारीता तयार करण्यात आलेल्या तपासयादी नुसार नायगाव पोलीस ठाणेचे सपोनि/ शैलेंद्र पाटील यांनी मयताची ओळख पटवुन सदर गुन्हा करणा-या आरोपीत व विधीसंघर्षीत बालक यांचा शोध सुरु होता. सदर गुन्हयातील आरोपीत यास देविदास उर्फ पक्या सुरज सिंग वय ३० वर्ष व्यवसाय- रिक्षा चालक रा.रुम नं.६६७,शांती गोविद मार्ग,आनंदी निवासच्या बाजुला,चंद्रपाडा नायगांव पुर्व ता.वसई जि.पालघर यास दिनांक २८/११/२०२३ रोजी अटक करण्यात आले आहे.

सदर गुन्हयामध्ये अटकमध्ये असलेले आरोपीत नामे देविदास उर्फ पक्या सुरज सिंग वय ३० वर्ष व्यवसाय- रिक्षा चालक रा.रुम नं.६६७,शांती गोविद मार्ग,आनंदी निवासच्या बाजुला,चंद्रपाडा नायगांव पुर्व ता.वसई जि.पालघर यांचे कडे गुन्हयाबाबत चौकशी केली असता नमुद गुन्हयातील मुख्य आरोपीत विधीसंघर्षीत बालक हा असल्याचे समजताच त्यांचे बाबत नायगाव पुर्व येथे राहत असलेले मित्र यांच्याकडे फरार असलेल्या विधीसंघर्षीत बालक यांच्या वास्तव्याबाबत कौशल्यपुर्ण चौकशीत माहीती प्रप्त केली असता केलेल्या चौकशीच्या आधारे व मिळालेल्या गुप्तबातमीव्दार यांच्या आधारे सदर विधीसंघर्षीत बालक हा गुन्हा केल्यापासुन मालाड मुंबई या परिसरात कोठे जागा मिळेल तेथे राहत असल्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर विधीसंघर्षीत बालक यास शोधण्याकरिता वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे यांनी दिलेल्या ओदशाप्रमाणे नायगाव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/देवरे व सपोनि/केकान यांच्या नेतृत्वाखाली दोन पथके बनवुन त्यांचा कसुन शोध घेत असताना सदर विधीसंघर्षीत बालक हा फुटपाथावर झोपुन असताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/शैलेंद्र पाटील, सपोनि/गणेश केकान, सपोनि/रोशन देवरे, पोहवा/देविदास पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, चेतन ठाकरे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, अशोक पाटील यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

----0000----